"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार या योजने अंतर्गत लेखाशीर्ष २२२५ ई ७७७" या लेखा शीर्षा खाली तरतूद वितरण आदेश सन २०१७-१८

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन ज्ञापन, क्रमांक: पूरक-२०१७/प्र.क्र.२१८/शिक्षण-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २६ सप्टेंबर, २०१७

वाचा : १) शासन निर्णय, सा.न्या. व वि.स.वि.क्र.बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दि.६.१.२०१७
२) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/शावगृ/स्वाधार योजना/ खर्च माहिती/२०१७-२०१८, दिनांक ७/७/२०१७.
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पुरक-२०१७/प्र.क्र.१२९/ अर्थसंकल्प-३,दि.१/९/२०१७

ज्ञापन :-

आयुक्त, समाजकल्याण,पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार या योजने अंतर्गत २२२५ ई ७७७** या योजनेखाली सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता करण्यात आलेल्या एकुण रू.२०९.०९९६ कोटी मागणीपैकी वित्त विभागाने घालुन दिलेल्या निकषाप्रमाणे ७० टक्के रु.१४६.३६९७२ कोटी (अक्षरी एकशे सेहेचाळीस कोटी छत्तीस लाख सत्त्यान्नव हजार दोनशे फक्त) इतकी तरतूद पुरवणी मागणीच्या स्वरूपात वितरीत करण्यास या ज्ञापनाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबतचे विवरण खालीलप्रमाणे आहे:-

(रुपये कोटीमध्ये)

लेखाशीर्ष/संगणक संकेतांक	सन २०१७-२०१८			
	एकूण अर्थ-संकल्पीय तरतूद	वित्त विभागाने उपलब्ध केलेली तरतूद ७०%	या पूर्वी वितरीत करण्यात आलेली तरतूद	या ज्ञापना अन्वये वितरीत तरतूद
१	२	३	४	५
मागणी क्रमांक एन-३ मुख्य लेखाशिर्ष - २२२५ अनु.जाती, अनु.जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१ अनुसुचीत जातीचे कल्याण, ७८९- अनुसुचीत जातीची उपाययोजना, ०३ अनुसूचीत जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणीक सुविधांकरीता अनुदान (०३)(०१) भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना (२२२५ ई ७७७) ३१-सहायक अनुदान (वेतनेतर)	२०९.०९९६	१४६.३६९७२	निरंक	१४६.३६९७२

२. संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी उपरोक्त विवरणातील रकाना ३ मध्ये वितरीत करण्यात आलेल्या तरतूदीच्या मर्यादेत विहित प्रयोजनातूनच खर्च करावा. सदर निधी खर्च झाल्यावर त्याबाबतचे खर्चाचे विवरण (जिल्हानिहाय खर्च / लाभार्थी संख्या) व उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता शासनास सादर करण्याची दक्षता आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांची राहील.

३. उपरोक्त योजनेंतर्गत चालू आर्थिक वर्षातील लेखानुदान खर्चाचे तसेच मागील वर्षातील खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे नियंत्रक अधिकारी यांनी तपासण्याच्या अधिन राहून निधी खर्च करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकाऱ्यांची राहील. तसेच वित्तीय नियमावली, महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका यानुसार वेळोवेळी वित्त विभागाने निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार सदर निधी खर्च करुन कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी आयुक्त,समाजकल्याण , पुणे यांची राहील.

४. नियंत्रक अधिकारी यांनी निधी खर्च करताना वित्त विभागाच्या दिनांक १८ एप्रिल, २०१७ व दिनांक ३० जून,२०१७ च्या परिपत्रकामधील अटींची पुर्तता झाली असल्याची खातरजमा करुन निधी वितरीत करण्यात यावा.

५. सदर ज्ञापन वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७ व वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून २०१७ नुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलल्या अधिकारास अनुसरुन तसेच वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ क्र.३६८/२०१७/व्यय-१५, दिनांक १३.०७.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.तसेच वित्त विभागाने सुचविलेल्या अटींची स्वतंत्रपणे पुर्तता करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२६१७२३३७२७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justic and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d81b5c910bad5837d7f88ac97a75b312f0e5744ecbdc45b7704dcb27f5d4dfef, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2017.09.26 17:11:25 +05'30'

(अ. कों. आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
३. महालेखापाल १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
४. वित्त विभाग (व्यय-१४/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
५. संचालक, लेखा व कोषागारे, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईट, मुंबई
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
७. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८. निवडनस्ती (शिक्षण-२)